दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

रविवार दिनांक 24/05/2026

पिंपरी चिंचवड | पुणे

e Paper

# थेरगावमध्ये 'भाईगिरी'चा रक्तरंजित थरार!

## कोयत्याने तरुणावर जीवघेणा हल्ला

>>>> | दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**पिंपरी-चिंचवड | प्रतिनिधी : युनूस खतीब**

**थेरगाव परिसरात मध्यरात्री कोयत्यांचा धाक दाखवत तरुणांवर जीवघेणा हल्ला केल्याची धक्कादायक घटना घडली आहे. "आम्ही पिंपरी-चिंचवडचे भाई आहोत" अशी धमकी देत आरोपींनी परिसरात दहशत निर्माण केली. या प्रकरणी काळेवाडी पोलिसांनी दोन आरोपींना अटक केली असून एक साथीदार फरार आहे.**




पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, सौरभ विलास चौधरी (वय 24) हे मित्रांसोबत थेरगाव येथील समर्थ क्लिनिकसमोर उभे असताना आरोपी गौरव ऊर्फ नन्या गौतम वाघमारे, रितेश क्षीरसागर आणि त्यांचा एक अनोळखी साथीदार ॲक्सेस दुचाकीवरून तेथे आले.यावेळी आरोपी गौरव वाघमारे याने शिवीगाळ करत कमरेतील लोखंडी कोयता काढून सौरभ चौधरी यांच्या डोक्यात आणि हातावर सपासप वार केले. त्यानंतर दुसऱ्या आरोपीनेही कोयत्याने हल्ला करत गंभीर जखमी केले. तिसऱ्या साथीदारानेही हल्ल्यात सहभाग घेतल्याचे फिर्यादीत नमूद आहे.

हल्ल्यानंतर आरोपींनी फिर्यादीच्या मित्रांनाही कोयते दाखवत "मध्ये आलात तर खल्लास करू" अशी धमकी दिली. तसेच हवेत कोयते फिरवत "आहे का कुणी टक्कर देणार?" असे म्हणत परिसरात दहशत माजवली.या प्रकरणी काळेवाडी पोलीस ठाण्यात विविध गंभीर कलमांखाली गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सपोनि नलावडे करीत आहेत.

# उशिरा कामावर आल्याच्या रागातून थेट हल्ला!

## कंपनीच्या केबिनमध्ये हातोड्याने मारहाण; कर्मचाऱ्याचा खून करण्याचा प्रयत्न

>>>> | दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**पिंपरी-चिंचवड | प्रतिनिधी : युनूस खतीब**

**खेड तालुक्यातील निघोजे परिसरात एका खासगी कंपनीत धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. उशिरा कामावर आल्याबाबत रागावल्याच्या कारणावरून संतप्त कर्मचाऱ्याने थेट वरिष्ठ अधिकाऱ्यावर हातोड्याने जीवघेणा हल्ला केल्याची घटना घडली आहे. या प्रकरणी दक्षिण म्हाळुंगे पोलिसांनी आरोपीला अटक केली आहे.**




पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, प्रविण ज्ञानेश्वर बोबडे (वय 34, रा. देहुगाव) हे संदिप टेक्नॉलॉजी प्रा. लि. कंपनीत कार्यरत आहेत. दि. 20 मे रोजी सकाळी कंपनीतील केबिनमध्ये असताना आरोपी योगेश चंद्रकांत माने (रा. बेळगा, ता. उमरगा, जि. धाराशिव) याने उशिरा कामावर आल्याबद्दल फिर्यादींनी रागावल्याचा मनात राग धरला होता.याच कारणातून संतप्त झालेल्या आरोपीने हातातील हातोड्याने प्रविण बोबडे यांच्या डोक्याच्या मागील बाजूस जोरदार प्रहार करत गंभीर जखमी केले. तसेच त्यांना जीवे मारण्याचा प्रयत्न केल्याचे फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे.या प्रकरणी दक्षिण म्हाळुंगे पोलीस ठाण्यात बीएनएस कलम 109 अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून आरोपीला अटक करण्यात आली आहे. पुढील तपास पोउपनि जायभाये करीत आहेत.

